# महाकाव्य–गोमांतक

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**महाकाव्य–गोमांतक : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ – २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/–

# महाकाव्य–गोमांतक

# गोमांतक

(परिचय – ह्या काव्याला प्रस्तावना म्हणून मुंबअीहून डॉ.ना.दा. सावरकर यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या 'श्रद्धानंद' मध्ये सन १९२७ मध्ये आलेला अभिप्रायच आजच्या कालाला अनुरूप अशा कंसात दिलेल्या नव्या घटना घालून खाली दिला आहे. तो अभिप्राय असा :–

सन १९२२ मध्ये कारावासात असताना, महाकवि वि.दा. सावरकर यांनी जे 'गोमांतक' नांवाचे महाकाव्य रचलें तें १९२४ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यांत त्या कवीने प्रतिभेच्या दुर्बिणीतून भविष्यकाळाच्या घटना, त्या घडणाऱ्या कितीतरी आधी, यथातथ्य रीतीने प्रत्यक्ष पहाव्या तशा पाहिल्या आणि वर्णिल्या आहेत. 'गोमांतक' काव्य हें केवळ काव्य नसून अचूक वर्तविलेले भविष्यच ठरले आहे ! ! कारण आता गोमांतकात घडत असलेली शुद्धि-आंदोलनें, शुद्धिसमारंभ (पोतुगीजांच्या राजसत्तेचा अुच्छेद, तेथे आज स्थापन होणारा स्वतंत्र भारताचा महत्त्वाचा नौदल तळ) अित्यादि घटना या काव्यात काही वर्षापूर्वीच वर्णिलेल्या आणि वर्तविलेल्या वाचून आजच्या ह्या घटना म्हणजे त्या वर्णनाची केवळ छायाचित्रेच भासावीत अितकें आश्चर्यकारक सादृश्य त्यांत आहे. द्रष्ट्या कवीचा शब्द न् शब्द कसा खरा ठरत आहे ! 'वाचमर्थोऽनुधावति' ह्या अुक्तीचा प्रत्यय येत आहे. कल्पनासृष्टि जशीच्या तशीच वस्तुसृष्टींत अुतरली. प्रतिभेची ही सिद्धि, हा चमत्कार ज्यांस प्रत्यक्ष पहावयाचा असेल त्यांनी महाकवि हिंदुहृदय सम्राट विनायक दामोदर सावरकर यांनी 'महाराष्ट्र भाट' या टोपन नावांने रचलेले 'गोमांतक' हे महाकाव्य अवश्य वाचावें'

या काव्याचा हिंदी भाषेतील गद्य अनुवाद रा.स्व. संघाचे अेक नेते श्री. माधवराव मुळे यांनी केला. याचा मराठी गद्य मराठी आचार्य बाळाराव सावरकर (संचालक वीर सावरकर प्रकाशन) यांनी सन १९७० मध्ये स्वत: करून तो प्रसिद्ध केला आहे.

# गोमांतक

## (पूर्वार्ध)

होती अेक नदी नामें दारका तापहारका
प्रतिच्चंद्रलेखेव तन्वंगी धवलोदका १
हराचा हरण्यासाठी तो हलाहलताप गा
दंग स्वर्गांत आणी जी पापक्षालनिं आपगा, २
भगीरथसमा सम्राट कुलांच्या वसुधातलीं
भागीरथी महत्कार्यी अैशा संतत गुंतली; ३
अेतदर्थचि जे अैसें महान नसलें जरी
पुण्य होयचि दीनांचे तृष्णासांत्वन कीं तरी; ४
असे जाणुनि, जीं गावें तान्हेली बहु त्यांजला
नदी चिमुकलीशी ही जाअी पाजित सज्जला. ५
सिंहीण शावकासी ती सिंहाच्या वितरी पया
पावने हरिणी ही हरिणा पय द्यावया ६
शोभवी दारकेसी हा तटग्राम लहानसा
फुलांचा झुबका कोण्या रानमोगरिला जसा, ७
हिरवी चार चौभोंती शेती दूरवरी फुले
सिंधूंत बेट की तैसें गाव तींत मधे खुलें ८
शेतीचे गीत ‘ये बैला !’ अशा अुंच दृढस्वरी
पहाटेस अुठे फुल्लां गंधांच्या सह अंबरी ९
मोटांतूनि पडे धो धो पाणी पाणथळामधी
स्निग्धगंभीर नादाने मोर नाचति त्या तधी १०
दया जरी निसर्गाची पूर्वीपासुनिया जशी
गावावरी तया होती होती आजहि की तशी; ११



तरी सुरूपही जैसा दिसावा दुखणेकरी,
जाळिला ज्या विजेनें तो जीवे वृक्ष कसातरी, १२
परचक्रार्त हे तैसे गाव भार्गव की धरी
म्लानता वर्तमानाची गतवर्ग मुखावरी १३
द्वाराशी भग्नवेशीच्या भिंत अेकचि ही नभीं
हृदभग्ना अर्धशल्याचें की शेषार्ध तशी अुभी १४
देवालय महादेवाचें जे सन्निध जीर्णसें
धर्मकेंद्र समाजाचें अेक हे अुरलें असे १५
येथे प्रदक्षिणा भोतीं घेताना युवतीं, मुले
त्यांची गुंफित बैसावी चाप्यांची गळतीं फुले १६
वृक्ष जो परिजाताचा शेजारीच मठांत या
फुलांही तों अणी वाके गाव गर्व भरे तया १७
जी पारिजातकाची या कथा दंतकथा कथी
ती पूर्वी नारदा सांगे स्वयें अर्जुनसारथी; १८
की भामा रूक्मिणी आणी कोणीहि दुसरीचिया
प्रांगणी पारिजातासी सहू न शकली तया, १९
दोघींच्याहि तअीं अीर्ष्ये हराया सहसा हरी
वाहूनि पारिजाता दे भृगूंच्या चरणांवरी; २०
तैं निजाश्रमिं ज्या देअी ऋषि रोपुनि वृक्ष की
तोचि हा मठ, हा तोची पारिजातक आणखी ! ! २१
दहा पांच दुकाने जी मध्यवस्तिंत लागली,
रंगवूनि खडूने जीं गेरूनेचि चितारिली, २२
‘मुखपेठ’ असे मानी स्थला नांव मिळे तया
येती रंगेल येथेची सायंकाळि फिरावया, २३
जाता शेतां सकाळी कीं दुकानी दिधलें, तया
नळ्यांत भरूनी तैलें सांजे नेति अिथें स्त्रिया. २४
कवड्या चलनी नाणें घेत देत जिरेमिरे
वाणी दुप्पट दामा घे–हिशोब चुकुनी बरें २५

तशांत मोठ्या पोटाचे ज्यांत शोभति शेटजी
दुकाना लाधली अेका पेढी ही पदवी अजी; २६
मुलें भिकार तेथे जैं भीक दाटुनि मागती
पायाची आग शेटींच्या पोटा थेटचि जात ती; २७
दंडूं त्या जों स्वदेहासी शेट नीट अुभारिती
मुलें तो शकतीं जाअू अर्धा धावुनि गांव ती २८
सोडूं गाअी सकाळीं जो अुशीर बहुधा करी
घेअूं मलें गुराख्याचीं सूड त्या भटजीवरी, २९
जाता कुठे त्यांची वस्त्रे वाळत सोवळीं
दिसांचि शिवोनी त्या काढिती पळ तत्पली. ३०
गावात जोड ना ज्यासी निघता नव मल्ल तो
यात्रे शेजारच्या गावीं जननीपद वंदितो; ३१
'संभाळि बरें !' आअी कथिता, हसुनी पुढे
निघे नीट जिथे यात्रा मल्लरंगण ते पडे; ३२
आणि कुस्तींत पडोनी गडी दुप्पटसा झणीं
परते पटका जेतेपणाचा पटकावुनी; ३३
तै स्वागता किती वेशीपाशी ते जन दाटले
'जै जै' करांत गावाचे लघु अंबर फाटले ३४
सबळें वाजता चाले छाती काढुनि कीं जसें
मारूनि रावणा साकेतासि रामचि येतसे ३५
गावांतची तरी धाडी माहेरा नच सासरा
म्हणूनि भाअू बालेचा टपे संमत वासरा. ३६
येता नदीपथे भेटे, भावापासुनिया स्वसा
मेवा किंवा मुका घेअी मेव्याहुनि मिठाससा ३७
पंचाअीत सभा पंचांची जी वाद हरावया,
पाटील धीट गावाचे रक्षणासि करावया ३८
नित्यनैमित्तिका सर्वां धर्मासी करवी करी,
ग्रामोपाध्याय गांवाची दुरिते पळवी दुरी: ३९



दैवी भौतिक आपत्ती अैशा होवूनिया दुरी
निश्चिंत अेकनिष्ठेने शेती शेतकरी करी; ४०
मुकुटासम जैं शेती सोनेरी कणसें धरी
प्राण देही डुले तैसें समाधान घरोघरी, ४१
तदा वर्षभरी जो जो अुणीव अपुली पुरी
कोष्टी कुंभार वंजारी सुतारादिक कीं करी, ४२
त्या त्या सहाय्यका साऱ्या निजा शेतकरी मुदें
धान्यभाग यथान्यायें विभागूनि ठरीव दे; ४३
धान्यसंग्रह वर्षासी अवश्य तितुका जना
पुरूनीहि अुरे जो की, ज्यांचे संप्रति काज ना ४४
समुदायहितासी ते समाअीक निधीमध्ये
पाटील धान्य गांवाच्या पेवांमाजि भरून दे; ४५
अवर्षणाचे दुर्दैवे येता संकट भूतलीं
करील धान्यसंपत्ति लोकपोषण त्यातली; ४६
ग्रामसंस्था अशी जी की प्रतिग्राम करीतसे
लोकसत्ताकची कोणी स्वयंपूर्ण लहानसे, ४७
आसन्नमृत्यु संस्था ती आणि की जनताहि ती
परराज्यप्रबंधाच्या रोधें घेत पराकृति ४८
मद्याची मध्यवस्तींत दुकानें बसलीं नवीं
कशी तशी कृषी सोशी करकर्षण दानवी ४९
परी ह्या ग्रामसंस्थेच्याहूनीहि पहिली तशी
प्राणभूतचि गावाची संस्था जी दुसरी अशी ५०
ती होय हा युगस्थायी वटवृक्ष महायशा
विस्तारल्या जयाच्या की पारंब्या प्रतिवृक्षशा ५१
आला तो पाहुणा जाअू शकलाचि न मागुता
पाहिल्याविण या वृक्षा अैकिल्याविण वा कथा; ५२
कीं पूर्वी ज्या दिनी वीरोत्तंसभार्गवमार्गणे
लावी संकप सिंधुतें हटण्या शतयोजनें, ५३

त्या दिनींच तथा वगैरे विजयध्वजची तसा
रोपिला वृक्ष हा आणि गाव स्थापियला असा ! ५४
पार हेमाडपंती हा ! चुन्या वा चिखला विना
मंत्रे बद्ध शिला ! अैसा या 'अख्ख्या पृथमींत'ना ! ५५
अखंड जात्यायेत्यांचे गप्पापीठचि पार तें
राजकारण गावाचें तें ते तेथचि घाटते; ५६
संथागार दिनी आणी पार रात्रिस होय हा
रंगभू सार्वजनिका या कुणीहि कुणी पहा; ५७
तुणतुणे तंबुऱ्यासी तें ढोलके तबल्या भिडे
लावण्यांच्या चढाओढीसि न रात्रि पुरी पडे; ५८
ये तिथे फिरता साधू धुणी लावुनिया बसे
प्रार्थिता बहुती सांगे लवलेश कुठे कसे ५९
वदे चिलमिच्या, शब्दी शब्दीं, सोडित जो धुरा;
विलायत कशी आहे कशाच्याचि पुढे जरा; ६०
अवधूत असो : प्रेमें वधूहि वट वृदध तो
अुपसितां, नव्या वृक्षा किती मत्सर वाटतो ! ६१
तया वंद्य वटाध्यक्षत्वाच्या वत्सल सवली
खाली जशी प्रजापक्षें छावणी अपुली दिली ६२
तशीच चावडी ही ही, लुप्तश्रीक अजी तरी
कैं कैं राज्याधिकाऱ्यांचा शिबिरध्वज ती धरी, ६३
जसे त्या दिवशी : कीं जै येताति फिरतीवरी
मामलेदार तैं गांवी कोण धांदल ती तरी ! ६४
जो तो ह्या त्या निमित्तें त्या पंथे जात विलोकुनी
भीतभीत दुरोनी त्या धुमकेतू जसे कुणी; ६५
जरी पाटील बोवांच्या भव्य गालमिशा कधी
तशीच कुळकर्ण्याची लेखणी लवचीक ती ६६
खूपची वाढवीती तन्महत्त्व भय अंतरी
मनीं गावकऱ्यांच्या की त्याचि अेक दिनी तरी ६७



मामलेदार जैं जाता फिरती करूनी घरा
घ्यावया मुजरा त्यांचा मान वाकविती जरा ६८
तिथेचि पुर्तुगीजांची शाळा अेक नवी भरे
राग कां न तिचा यावा भाअू पंतुजिनां बरें ! ६९
ओसरी ओस तो यांची परस्थ परधर्मदा
शाळे त्या घोकिता जाती भ्रष्ट शब्द मुलें तदा; ७०
'क्रिस्त', 'क्रूस', 'कुलंबीया,' 'अलबुकर्क', हरे ! हरे !
श्रीगणेशाविनाची ते शिकताति धुळाक्षरें ! ! ७१
पुर्तुगीज ! अहा आजी नांव हे शतवत्सरें
आले करीत ह्या गावी भयग्रस्त जनांतरे ७२
धरिताची वृकें धेनु झेपें व्याघ्र जरी त्वरें
क्रूरशा वदनांतूनी धेनु क्रूरतरी पडे, ७३
तशी गोमांतकी देता पुर्तुगीज पदांप्रती
अिस्लामाच्या मुखांतूनी अिसाच्या पडली क्षिती. ७४
व्याघ्रे संत्रस्त रानींही मरता मरता जशी
हरिणें कळपांतूनी जगतात कशी बशी, ७५
गोमांतकाचिया रानी हरिणी–कळपातलें
असा कळप हा होते अेक भार्गव आपलें ७६
साध्या गावात ह्या साधें प्रिय आणि सुशीलसे
कुटुंब अेक विप्राचे सुप्रतिष्ठित हे असे; ७७
श्रीमहामंडलाधीश कदंब नृपतीचिया
कालात धर्मवित्त्वाचा होता मान कुलासि या; ७८
पुढे ज्या दुर्दिनीं देशाचे या दैव फुटोनिया
स्वातंत्र्याची अहा गेली तरवार तुटोनिया ७९
त्या दिनी ह्या कुलाचेही पडले नर झुंजुनी
पूर्वी सभांगणी तैसे आता धर्मरणांगणी ८०
तुरूष्कु अधिकारी तो अेकदा सहजी करी
अेका स्त्रियेे कुलाच्या या गुलाम म्हणुनि घरी ८१